IO प्रत
53

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** शिरढोण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0031 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/02/2026 20:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 08/12/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/12/2025

**Time From (वेळेपासून):** 15:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:16 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/02/2026 **Time (वेळ):** 20:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 025

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/02/2026 20:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस ठाणे शिराढोण ,कळंब

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

(56)



6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश भालचंद्र वेळापुरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वि धाराशिव,धाराशिव,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वि धाराशिव,धाराशिव,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9049519833

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश महादेवराव शेळके | | | 1. पोलीस ठाणे, शिराढोण, ,कळंब, शिरढोण,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 03.02.2026

मी योगेश भालचंद्र वेळापुरे, वय 42 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पद - पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव मो.क्र. 9049519833. समक्ष पोलीस ठाणे, शिराढोण येथे हजर राहुन सरकारतर्फे फिर्याद देतो की,

मी दिनांक 08/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे कर्तव्यावर कार्यालयात हजर असताना तक्रारदार मुजाहिद रियाजअहमद मुजावर, वय 37 वर्षे, व्यवसाय पत्रकारीता रा.मोमीन गल्ली, कळंब ता. कळंब जि. धाराशिव मो.नं.7083272723 यांनी आम्हाला फोन वरुन संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणी बाबत तक्रार देणे असल्याचे सांगुन तक्रारदार हे धाराशिव येथील डी मार्ट समोर येऊन तक्रार देणार असून, सदर तक्रार नोंदवून कार्यवाही करणेबाबत विनंती केली. असता आम्ही तहसीलदार, तहसील कार्यालय, धाराशिव यांचेकडुन दोन पंच मागणी केली असता, त्यांनी दोन पंच उपलब्ध केल्याने सदर दोन पंच आमचे कार्यालयात हजर झाले.

त्यावेळी मी योगेश भालचंद्र वेळापुरे, पद- पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. धाराशिव अशी पंचांना ओळख करुन दिली. त्यावेळी कक्षात पोकॉ / 1705 तावसकर, पोकॉ / 960 काझी हजर होते. त्यानंतर पंचांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव 1) विरभद्र बसवराव स्वामी, वय 29 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद महसुल सहाय्यक, तहसिल कार्यालय, धाराशिव रा.संचारभवन, BSNL कॉटर, धाराशिव मुळ रा.गुंजोटी, ता.उमरगा जि. धाराशिव 2) हनुमंत विठ्ठल भवाळ, वय 39 वर्षे, व्यवसाय नोकरी, सहाय्यक महसुल अधिकारी, तहसिल कार्यालय, धाराशिव, रा.महात्मा गांधी नगर, धाराशिव मुळ रा.खरोळा ता.रेणापुर जि.लातुर असे सांगितले. त्यावेळी मी दोन्ही पंच व पोलीस अंमलदार यांना आज दि 08.12.2025 रोजी एका तक्रारदाराने आम्हाला फोन वरुन संपर्क करुन एका लोकसेवका विरुध्द लाच मागणी बाबत तक्रार देणे असल्याचे सांगुन धाराशिव येथील डी मार्ट समोर येऊन तक्रार नोंदवून कार्यवाही करणेबाबत विनंती केली आहे. त्यावरुन आपण आज रोजी धाराशिव येथील डी मार्ट येथे जाऊन सदर तक्रारदार यांची तक्रार घेऊन त्याप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही व सोबत पोशि/तावसकर, पोशि/काझी व दोन पंच सापळा कारवाईसाठी लागणारे आवश्यक ते साहित्य घेऊन शासकीय वाहन क्रं एम.एच. 25 सी. 6584 ने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथुन डी मार्टकडे कडे 12.45 वाजता रवाना होवुन 13.00 वा. धाराशिव येथील डी मार्ट समोर पोहचलो. त्यानंतर तेथे एक इसम आमचे शासकीय वाहनाजवळ आला. त्यावेळी आम्ही सदर इसमास त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मुजाहिद रियाजअहमद मुजावर, वय 37 वर्षे, व्यवसाय पत्रकारीता रा.मोमीन गल्ली, कळंब ता.कळंब जि. धाराशिव असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार मुजावर यांची आम्ही त्यांचे तक्रारीबाबत पंचासमक्ष तक्रार घेतली असता त्यांचे तक्रारीतील मजकुर असा की,

मी मुजाहिद रियाजअहमद मुजावर, वय 37 वर्षे, व्यवसाय पत्रकारीता रा.मोमीन गल्ली, कळंब ता.कळंब जि. धाराशिव मो.नं.7083272723.

आज दिनांक 08.12.2025 रोजी मी आपणाला फोन करुन माझी एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत तक्रार असून, आपण धाराशिव येथील डी मार्टचे समोर येऊन माझी तक्रार नोंदवुन कारवाई करणे बाबत कळविले होते. त्यावरुन मी आज रोजी धाराशिव येथील डी मार्ट समोरील रोडचे बाजुला सुरक्षीत ठिकाणी आपले समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून, पत्रकारीता व्यवसाय करतो.

मला मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्त्याचा क्लब चालु करणे असल्याने मी दिनांक 04.12.2025 रोजी पोलीस ठाणे, शिराढोण येथे जाऊन मंगरुळ बीटचे बीट अंमलदार वाळके मॅडम यांना भेटुन त्यांना, मला



Scanned with OKEN Scanner

मंगरुळ पाटीजवळ गो शाळेच्या पाठीमागे पत्त्याचा क्लब चालु करणे असले बाबत सांगीतले. तेंव्हा वाळके मॅडम यांनी बीटमधील शेळके साहेब यांना बोला असे सांगीतले. त्यावेळी मी माझ्या मोबाईलवरुन शेळके साहेब यांना फोन लावत असताना वाळके मॅडम यांनी मला तुमच्या मोबाईलवरुन फोन लावु नका, असे म्हणुन त्यांनी त्यांचे मोबाईलवरुन शेळके साहेब यांचे मोबाईलवर फोन लाऊन मला बोलण्यास दिले. त्यावेळी मी शेळके साहेब यांना मला मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्त्याचा क्लब चालु करणे असले बाबत सांगीतले असता, शेळके साहेब यांनी मला तुला पत्त्याचा क्लब चालु करायचा असल्यास महिन्याला 40,000/-रु. दयावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे असे म्हणालो व तेथुन निघुन आलो.
त्यानंतर दिनांक 07.12.2025 रोजी शेळके साहेब यांचा माझे मोबाईलवर मिस कॉल पडल्याचे दिसल्याने मी त्यांना माझे मोबाईलवरुन शेळके साहेब यांच्या मोबाईलवर फोन लाऊन बोललो असता, त्यावेळी त्यांनी मला सोमवारी पोलीस ठाणे, शिराढोण येथे भेटण्यास बोलावले आहे.
मला मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्त्याचा क्लब चालु करण्यासाठी पोलीस ठाणे, शिराढोण येथील मंगरुळ बीटचे शेळके साहेब यांनी मागीतलेले 40,000/-रु. ही कोणतीही शासकिय फी नसुन, ती लाचच असल्याची माझी खात्री झाली. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. माझी व शेळके साहेब यांचा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसनवारीचा व्यवहार नसुन, त्यांची व माझ्यामध्ये कोणतेही आपसी दुश्मनी नाही.
आज दिनांक 08.12.2025 रोजी मी पो ीलीस ठाणे, शिराढोण येथे जाऊन मंगरुळ बीटचे शेळके साहेब यांना भेटुन मला मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्त्याचा क्लब चालु करण्याचे कामाबाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे पैशाची मागणी केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणेस विनंती आहे. माझी वरील तक्रार मी माझ्या स्वत:चे हस्ताक्षरात लिहलेली असून, ती बरोबर व खरी आहे. वगैरे तक्रार दिली त्यावर तक्रारदार, दोन पंच ü व आम्ही सहया केल्या.
त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकातील पोलीस अंमलदार असे शासकीय वाहनाने व तक्रारदार मुजावर हे त्यांचेकडील मोटार सायकलने शिराढोण येथे 13.55 वाजता रवाना होऊन शिराढोण ते कोल्हेगाव जाणारे रोडचे बाजुला शिराढोण शिवारात रस्त्याचे बाजुला सुरक्षीत ठिकाणी जावुन पोहचलो. तेथे पोहचल्यानंतर आम्ही सदर तक्रारदार मुजावर यांचे तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक 08.12.2025 रोजी तक्रारदार यांना त्यांच्या कामासाठी लोकसेवक शेळके पोलीस हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? या बाबत लाचमागणी पडताळणी करणेसाठी आम्ही तक्रारदार व पंच क्र.01 स्वामी यांना लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचकेडील मोटार सायकल क्र. MH 25 AX 6670 ने पोलीस ठाणे शिराढोण येथे 15.52 वाजता चे सुमारास रवाना केले. त्यांनतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.1 हे मोटार सायकलने 17.16 वा. सुमारास सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आम्ही प्रथम पंच क्र.01 यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, " मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मोटार सायकलने पोलीस ठाणे शिराढोण येथे गेलोत. त्यानंतर तक्रारदार यांनी इतर व्यक्तीला शेळके साहेब कुठ गेलेत असे विचारले. त्यावेळी सदर व्यक्तीने शेळके साहेब घरी गेले असल्याचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन लोकसेवक शेळके यांना फोन लावुन स्पिकर ऑन करुन बोलले त्यावेळी लोकसेवक शेळके यांनी यायलो तिकड यायलो असे सांगितले. त्यानंतर शेळके साहेब हे पोलीस स्टेशन येथे आले. त्यावेळी शेळके साहेब यांनी तक्रारदार यांना बोला की तुमचा काय विषय आहे मला सांगा असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी शेळके साहेब यांना पत्याचा क्लब टाकायचय म्हणतो तुम्हाला तर असे म्हणाले. त्यावेळी शेळके साहेब यांनी तक्रारदार यांना कुठ असे विचारले. त्यावर तक्रारदार यांनी शेळके साहेब यांना हं.. गोशाळा आहे का .. आतमधी टाकायचय पलिकडुन असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांना हिकड कस बसताय पोलीस स्टेशनच वेगळ.. बरका क्लिअर सांगतो डीवायएसपी ऑफीसच वेगळ आणि एलसीबीच एलसीबीच वेगळ असतय असा खेळ हाय. चला सुपारी खायला असे म्हणाले. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणे समोरील पान पटटीमध्ये सुपारी खाण्यासाठी गेलो. त्यानंतर तेथुन परत पोलीस ठाणे शिराढोणचे गेट जवळ आलो. त्यानंतर लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांना क्या करणा पडता तुमको.. डीवायएसपी ऑफीस.. और एलसीबी.. इनकी मंजुरी लेना पडता.. असे म्हणाले. तुम क्या दे सकते तुम बोलोना मै बोलता साबको.. आयसा आयसा बोलरे बोलके.. लगेच बात करता.. असे म्हणाले. त्यवार तक्रारदार यांनी शेळके साहेब यांना बर सांगा तरी अस.. म्हणाले. त्यावर लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांना सांगीतल की तुम्हाला.. त्यादिवशी मॅडमनी सांगीतल की चाळीस पर्यंत जातय ती आमच्यात.. पर्यंत जातय आस.. मी सांगायलोय की तुम्हाला.. बिट अंमलदार तिन अधिकारी.. तुम्हाला का खोट बोलत नाही ओ मी दुसऱ्या बिट.. तुम्ही ज्या बिटच्या भागामधी करताव त्याच बिट अंमलदारचा अधिकार पडतो ही का मटका नाही इथुन घ्या आणि तिथ दया ही बैठे खेळ असतो बरोबर हाय का.. असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवक शेळके यांना ठिक हाय चाळीस फिक्स ना तुमचे.. असे विचारले. त्यावर



Scanned with OKEN Scanner

लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांना हां.. असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक शेळके यांना चाळीस हजार देतो तुम्हाला.. त्यातले समजा की आज तुम्हाला एक संध्याकाळ आठ वाजेपर्यंत पाच हजार पोहचवतो मी आणि उरलेले माझा डब्बा तिथ फाईनल झाला की तिथ तुम्हाला पैसे ती देतील नंतरच उदघाटन.. चालेल.. असे विचारले.. त्यावर लोकसेवक शेळके यांनी होकारआर्थी मान हालवुन बोलतो असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार यांनी मला तेथुन निघण्याचा इशारा केल्याने आम्ही मोटार सायकलवर बसुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. " असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार मुजावर यांनी पंच क्र.1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच हकीकत सांगितली.

एकंदरीत तक्रारदार व पंच क्र.1 यांना स्वतंत्रपणे विचारपुस करता व व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता तक्रारदार मुजावर व लोकसेवक शेळके पोलीस यांचे भेटी दरम्यान लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांना मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्त्याचा क्लब चालु करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे लोकसेवक शेळके यांनी 40,000/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 5000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे व फोन केल्यानंतर 5000/- रुपये घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हाला कळविले की, बराच वेळ झाला आहे लोकसेवक शेळके यांचा फोन आला नाही तरी मी माझ्या मोबाईल क्रमांकावरुन लोकसेवक शेळके यांना फोन लाऊन येणे बाबत विचारणा करतो. त्यावेळी आम्ही पंचाशी व सापळा पथकाशी विचारविनीमय करुन तक्रारदार मुजावर यांना त्यांचे फोनवरुन लोकसेवक शेळके यांना फोन करण्यास सांगीतले व त्यांचेतील मोबाईलवरील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डव्दारे ध्वनिमुद्रित केले असता, लोकसेवक शेळके यांचा मोबाईल स्विच ऑफ लागला. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हाला कळविले की, मला लोकसेवक शेळके साहेब यांचा फोन आल्यानंतर मी आपणास संपर्क करुन कळवितो त्यावेळी आपण शिराढोण येथे येऊन पुढील कारवाई करावी अशी विनंती केल्याने दिनांक 08.12.2025 रोजीची लाचमागणी पडताळणी केली. सदर बाबत सविस्तर लाचमागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर तक्रारदार मुजावर यांनी दिनांक 15.12.2025 रोजी आम्हाला फोनव्दारे विनंती केली की ते दिनांक 15.12.2025 रोजी लोकसेवक शेळके पोलीस यांना पोलीस ठाणे, शिराढोण येथे जाऊन त्यांचे कामाकरीता लोकसेवक शेळके पोलीस यांनी यापुर्वी दिनांक 08.12.2025 रोजी मागीतलेली लाच रक्कम 5000/- रुपये देणार असुन, पुढील कारवाई करणे बाबत कळविल्याने आम्ही यातील पंच यांना लागलीच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे बोलावुन घेऊन आम्ही व सोबत पोह/अनपट, पोकॉ/ काझी व दोन पंच असे शासकिय वाहनाने रवाना होऊन एकुरका ते शिराढोण येथील रोडवर जाऊन तक ते शिराढोण येथील रोडवर जाऊन तक्रारदार यांची भेट घेतली. सदर वेळी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन तक्रारदार यांना यातील लोकसेवक शेळके पोलीस यांचेविरुध्द दिनांक 15.12.2025 रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे पंच यांना सांगीतले. तसेच सदर सापळा कारवाई वेळी यातील लोकसेवक शेळके पोलीस यांना संशय येऊ नये म्हणुन या वेळेस पंच क्र. 2 हनुमंत भवाळ यांना तक्रारदार यांचेसोबत पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी दिलेल्या 500/-रुपये दराच्या 10 चलनी नोटा असे एकुण 5000/-रु. यांना पोह/अनपट यांनी ऍ्न्थ्रासीन पावडर लावण्याची कार्यवाही करुन लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट घेण्यासाठी पंच क्र. 2 यांचेसह त्यांना नेमुन दिलेला ईशाऱ्या बाबत माहिती देऊन व इतर सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पोकॉ/काझी यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉडर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसले बाबत खात्री करुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट कोठे होईल या बाबत विचारले असता, तक्रारदार यांनी लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट पोलीस ठाणे, शिराढोण येथे होईल असे सांगुन तक्रारदार व पंच क्र. 2 भवाळ यांना पाविले व काही वेळात ते परत आले.

त्यानंतर पोकॉ/काझी यांनी तक्रारदार यांचेजवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन आमच्याकडे दिले. तेंव्हा आम्ही तक्रारदार यांना बाजुला जाऊन थांबण्याची सुचना केल्याने तक्रारदार हे काही अंतरावर बाजुला जावुन थांबले. त्यानंतर आम्ही पंच क्र.01 यांचे समक्ष पंच क्र.02 यांना विचारणा केली की, आपणास लोकसेवक शेळके यांची भेट घेणे कामी तक्रारदार यांचेसह रवाना केले पासुन ते परत येई पर्यंतची हकिकत सांगावी. त्यावरुन पंच क्र.2 यांनी सांगीतले की, " मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मोटार सायकलने पोलीस ठाणे शिराढोण येथे गेलोत. गाडी बाजुला लावुन थांबलो. त्यानंतर पोलीस ठाणे, शिराढोण येथे जाऊन शेळके पोलीस यांना पाहिले असता, ते तेथे दिसले नसल्याने तक्रारदार यांनी तेथील इतर व्यक्तीला शेळके साहेबांबाबत विचारले असता, शेळके साहेब आज सुट्टीवर असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी मला तेथुन निघण्याचा इशारा केल्याने आम्ही मोटार सायकलवर बसुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. " अशी हकिगत सांगीतली.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर बाजुला जाऊन थांबलेले तक्रारदार यांना आम्ही जवळ बोलावुन दोन्ही पंचांसमक्ष विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र.2 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच हकीकत सांगितली. दिनांक 15.12.2025 रोजी तक्रारदार यांची व लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट झाली नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हाला कळविले की, मला लोकसेवक शेळके साहेब यांचा फोन आल्यानंतर मी आपणास संपर्क करुन कळवितो त्यावेळी आपण शिराढोण येथे येऊन पुढिल कारवाई करावी अशी विनंती केली. त्यावरुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकाशी विचार विनीमय करुन दिनांक 15.12.2025 रोजी सापळा कारवाई स्थगित करण्यात आली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेकडील सापळा कारवाई करीता ऍन्थ्रासीन पावडर लावुन देण्यात आलेल्या रुपये 500/- दराच्या 10 नोटा चलनी नोटा तक्रारदार यांचे ताब्यातुन घेऊन त्या एका हिरवट रंगाचे कागदी लिफाफ्यामध्ये ठेऊन सदरचा लिफाफा सिलबंद केला. त्यानंतर आम्ही व पंचांनी एका कागदाचे चिठ्ठीवर सहया करुन सदरची चिठ्ठी लिफाफ्यावर लाऊन सदरचा लिफाफा आमचे ताब्यात घेतला. तसेच दिनांक 15.12.2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे रेकॉर्ड झालेले व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डचा पोकॉ/काझी यांनी हॅशव्हॅल्यू काढल्यानंतर सदरचे मेमरीकार्ड एका हिरवट रंगाचे पाकीटमध्ये ठेऊन सदरचे पाकीट सीलबंद करुन त्यावर आमची व पंचाची सहीचे लेबल लावण्यात आले. दिनांक 15.12.2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईचा सविस्तर सापळा कारवाई स्थगिती पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर तक्रारदार मुजावर यांनी दिनांक 19.12.2025 रोजी आम्हाला फोनव्दारे पुन्हा विनंती केली की ते दिनांक 19.12.2025 रोजी लोकसेवक शेळके पोलीस यांना पोलीस ठाणे, शिराढोण येथे जाऊन त्यांचे कामाकरीता लोकसेवक शेळके पोलीस यांनी यापुर्वी दिनांक 08.12.2025 रोजी मागीतलेली लाच रक्कम 5000/-रुपये देणार असुन, पुढील कारवाई करणे बाबत कळविल्याने आम्ही यातील पंच यांना लागलीच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव येथे बोलावुन घेऊन आम्ही व सोबत पोह/अनपट, पोकॉ/ काझी व दोन पंच असे शासकिय वाहनाने रवाना होऊन एकुरका ते शिराढोण येथील रोडवर जाऊन तक्रारदार यांची भेट घेतली. सदर वेळी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन तक्रारदार यांना यातील लोकसेवक शेळके पोलीस यांचेविरुध्द दिनांक 19.12.2025 रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे पंच यांना सांगीतले. तसेच सदर सापळा कारवाई वेळी यातील लोकसेवक शेळके पोलीस यांना संशय येऊ नये म्हणुन या वेळेस देखील पंच क्र. 2 हनुमंत भवाळ यांना तक्रारदार यांचेसोबत पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.

त्यानंतर आम्ही यातील पंच क्र. 2 व तक्रारदार व पंच क्र. 1 यांना दिनांक 15.12.2025 रोजी सापळा कारवाई स्थगिती पंचनाम्यावेळी दिलेल्या ऍन्थ्रसीन पावडरचे गुणधर्म तसेच लोकसेवक शेळके पोलीस यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर करण्यात येणाऱ्या ईशाऱ्याबाबत तसेच लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट न झाल्यास इशारा न करता, सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येणे बाबतच्या सुचनांची पुनरावृत्ती करुन तक्रारदार व पंच क्र. 2 यांना पुन्हा दिनांक 15.12.2025 रोजी ऍन्थ्रासीन पावडर लावलेल्या 500/-रुपये दराच्या 10 चलनी नोटा ज्या दिनांक 15.12.2025 रोजी पाकीटामध्ये सीलबंद करुन ठेवलेल्या होत्या. त्या पाकीटाचे सील पंचासमक्ष काढुन सदरच्या चलनी नोटा तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशामध्ये अलगद ठेऊन दिली.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना व सापळा पथकातील सदस्यांना सविस्तर सुचना दिल्या व त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पोकॉ/काझी यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हॉइस रेकॉर्डरमध्ये टाकुन व्हॉईस रेकॉडर चालु करुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण रेकॉर्ड नसले बाबत खात्री करुन दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदार व लोकसेवक शेळके पोलीस यांचे संभाषण या व्हॉईस रेकॉडरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार असले बाबत सांगीतले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट कोठे होईल या बाबत विचारले असता, तक्रारदार यांनी लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट पोलीस ठाणे, शिराढोण येथे होईल असे सांगीतले.

त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पोकॉ/काझी यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे अंगावरील शर्टचे आतमध्ये बनीयनला छातीवर डाव्या बाजूस पिनने सुरक्षित लावुन तक्रारदार व पंच क्रमांक 2 हनुमंत भवाळ यांना तक्रारदार यांचेकडील मोटर सायकल क्रमांक MH 25 AX 6670 ने 15.58 वा. पोलीस ठाणे, शिराढोण येथे लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र. 1 व सापळा पथक असे शासकिय वाहनाने निघालो. तक्रारदार व पंच क्र. 2 हे पोलीस ठाणे, शिराढोण चे बाजुला जाऊन थांबलो.

त्यानंतर थोडयाच वेळात तक्रारदार व पंच क्र.02 हे पोलीस ठाणे, शिराढोण चे गेट बाहेर आले व तक्रारदार यांना त्यांना नेमून दिलेला ईशारा न करता तक्रारदार व पंच क्र. 2 हे त्यांचे मोटर सायकलवर 16.16 वा. तक्रारदार व पंच क्र. 2 हे सापळा पथक थांबलेल्या पुर्वीच्या ठिकाणी परत आले व त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच क्र. 1 व सापळा पथकातील पोलीस अंमलदार असे परत आलो.

त्यानंतर पोकॉ/काझी यांनी तक्रारदार यांचेजवळील व्हाईस रेकॉडर काढुन बंद करुन माझ्याकडे दिले. तेंव्हा आम्ही



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार यांना बाजुला जाऊन थांबण्याची सुचना केल्याने तक्रारदार हे काही अंतरावर बाजुला जावुन थांबले. त्यानंतर आम्ही पंच क्र.01 यांचे समक्ष पंच क्र.02 यांना विचारणा केली की, आपणास लोकसेवक शेळके यांची भेट घेणे कामी तक्रारदार यांचेसह रवाना केले पासुन ते परत येई पर्यंतची हकिकत सांगावी. त्यावरुन पंच क्र.2 यांनी सांगीतले की, " मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मोटार सायकलने पोलीस ठाणे शिराढोण येथे गेलोत. त्यानंतर पोलीस ठाणे, शिराढोण येथे जाऊन शेळके पोलीस यांना पाहिले असता, ते तेथे दिसले नसल्याने तक्रारदार यांनी तेथील इतर व्यक्तीला शेळके साहेबांबाबत विचारले असता, ठाण्यामध्ये कोणीच नसल्याचे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांनी शेळके पोलीस यांचे फोनवर फोन केला असता, तो बंद होता. त्यानंतर तक्रारदार यांनी मला तेथुन निघण्याचा इशारा केल्याने आम्ही मोटार सायकलवर बसुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो." अशी हकिगत सांगीतली.

त्यानंतर बाजुला जाऊन थांबलेले तक्रारदार यांना आम्ही जवळ बोलावुन दोन्ही पंचांसमक्ष विचारणा केली असता, तक्रारदार यांनी पंच क्र.2 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच हकीकत सांगितली.

दिनांक 15.12.2025 रोजी तक्रारदार यांची व लोकसेवक शेळके पोलीस यांची भेट झाली नाही व दिनांक 19.12.2025 रोजी देखील लोकसेवक शेळके पोलीस यांची तक्रारदार यांचेशी पोलीस ठाणे, शिराढोण येथे भेट झाली नसल्याने लोकसेवक शेळके पोलीस पोलीस ठाणे, शिराढोण यांना त्यांचे विरुध्दच्या कारवाईचा संशय आला असावा असे निष्पन्न झाले व तक्रारदार यांनी आम्हास सांगितले की, लोकसेवक शेळके पोलीस यांना माझा व कारवाईचा संशय आला असल्याने, ते आता माझ्याकडुन पैसे स्विकारणार नाहीत व माझ्याशी यापुढे संपर्क करणार नाहीत. असे मला वाटत असल्याने आपण लोकसेवक शेळके पोलीस यांचेवर पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. त्यामुळे आम्ही तक्रारदार, पंच व सापळा पथकातील सदस्याशी विचारविनिमय करुन सापळा कारवाई स्थगित करण्याचे सर्वानुमते ठरल्याने दिनांक 19.12.2025 रोजी सापळा कारवाई स्थगित करण्यात आला.

सदर दिवशी तक्रारदार यांचेकडे सापळा कारवाई करीता ॲन्थ्रासीन पावडर लावुन देण्यात आलेल्या रुपये 500/- दराच्या 10 नोटा चलनी नोटा तक्रारदार यांचे ताब्यातुन घेऊन त्या एका हिरवट रंगाचे कागदी लिफाफ्यामध्ये ठेऊन सदरचा लिफाफा सिलबंद केला. त्यानंतर आम्ही व पंचांनी एका कागदाचे चिठ्ठीवर सहया करुन सदरची चिठ्ठी लिफाफ्यावर लाऊन सदरचा लिफाफा आमचे ताब्यात घेतला. तसेच दिनांक 19.12.2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे रेकॉर्ड झालेले व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डचा पोकॉ/काझी यांनी हॅशव्हॅल्यू काढल्यानंतर सदरचे मेमरीकार्ड एका हिरवट रंगाचे पाकीटमध्ये ठेऊन सदरचे पाकीट सीलबंद करुन त्यावर आमची व पंचाची सहीचे लेबल लावण्यात आले. दिनांक 19.12.2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईचा सविस्तर सापळा कारवाई स्थगिती पंचनामा करण्यात आला आहे.

दिनांक 08.12.2025 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार मुजावर व लोकसेवक शेळके पोलीस यांचे भेटी दरम्यान लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांना मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्याचा क्लब चालु करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे लोकसेवक शेळके यांनी 40,000/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 5000/- रुपये स्वत:साठी स्विकारण्याचे मान्य केल्याचे व फोन केल्यानंतर 5000/- रुपये घेऊन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दिनांक 15.12.2025 व दिनांक 19.12.2025 रोजी तक्रारदार यांचे विनंतीवरुन लोकसेवक शेळके पोलीस यांचेविरुध्दचे सापळा कारवाई वेळी लोकसेवक शेळके पोलीस यांची पुन्हा भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे, शिराढोण येथे पाठविले असता, लोकसेवक शेळके यांची भेट झाली नाही. त्यामुळे यातील लोकसेवक शेळके पोलीस हे तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास खात्री झाली आहे.

त्यामुळे यातील आलोसे राजेश महादेवराव शेळके, पोहेकॉ/48, पोलीस ठाणे, शिराढोण, जि.धाराशिव यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन त्यांना मिळणाऱ्या कायदेशीर परिश्रमाखेरीज प्रवर्तक, दान, बक्षीस म्हणुन स्वत:चे आर्थिक फायदयासाठी तक्रारदार यांना मंगरुळ पाटीजवळील गो शाळेच्या पाठीमागे पत्याचा क्लब चालु करुन देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे स्वत:साठी व इतर लोकसेवकासाठी असे एकुण 40,000/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता 5000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे व फोन केल्यानंतर 5000/- रुपये घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच दिनांक 19.12.2025 रोजी सापळा कारवाई स्थगित केल्यानंतर तक्रारदार मुजाहिद रियाजअहमद मुजावर यांनी आज दिनांक 03.02.2026 रोजी लोकसेवक राजेश महादेवराव शेळके, पोहेकॉ/48, पोलीस ठाणे, शिराढोण, जि.धाराशिव यांना संशय आला असून, त्यांचा फोन बंद केला असून, ते तक्रारदार यांची त्यांचे कामाकरीता भेट घेणार नसल्याबाबत खात्री झाल्याचे सांगितल्याने त्यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई करणे बाबत कळविल्याने आज रोजी यातील नमुद आरोपी लोकसेवक राजेश महादेवराव शेळके, पोलीस ठाणे, शिराढोण, जि.धाराशिव यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलम 7, 7अ प्रमाणे



Scanned with OKEN Scanner

सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
DHARNIDHAR BABA KOLEKAR(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): DHARNIDHAR BABA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API



ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे,शिराढोण

Scanned with OKEN Scanner